महा मेट्रो

PUNE METRO

पुणे मेट्रोच्या फडके हौद ते स्वारगेट या भुयारी मार्गाचे निविदा मंजूर , टाटा गुलेरमाक या कंपनीला कॉन्ट्रॅक्ट दिले .

पुणे मेट्रोच्या उत्तर दक्षिण , म्हणजे पीसीएमसी ते स्वारगेट या मेट्रो कॉरिडॉर मध्ये एकूण १६.५८ किमी पैकी ५.०१ किमिचा मार्ग भुयारी आहे . हा मार्ग कृषी महाविद्यालय येथून सुरु होत असून स्वारगेट पर्यंत जमिनीखालून जातो. या मार्गात प्रथम स्थानक शिवाजीनगर बस स्टॅन्ड , नंतर सिविल कोर्ट , फडके हौद , मंडई व स्वारगेट अशी स्थानके आहेत .

या भुयारी मार्गाचे काम जलद गतीने पूर्ण करण्यासाठी कामाची विभागणी दोन भागात करण्यात आली होती व त्यासाठी स्वतंत्र दोन निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्रथम भाग स्वारगेट ते फडके हौद असा असून त्याचे कॉन्ट्रॅक्ट डिसेंबर २०१८ रोजी देण्यात आले होते . दुसरा भाग फडके हौद ते स्वारगेट असून त्याची निविदा १८.२.२०१९ रोजी टाटा गुलेरमाक या अग्रगण्य कंपनीस देण्यात आले आहे . हे कॉन्ट्रॅक्ट अवॉर्ड केल्यामुळे सिविल बांधकामाविषयी पुणे मेट्रोचे सर्व महत्वाचे कॉन्ट्रॅक्ट अवॉर्ड करण्यात आले आहेत .

फडके हौद ते स्वारगेट या भुयारी मार्गाला अंडरग्राउंड २ असे संबोधण्यात आले असून या कॉँट्रॅक्टची वैशीष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत .

* फडके हौद , मंडई , स्वारगेट येथे भुयारी स्थानके यांचे बांधकाम व यां स्थानकांना जोडणाऱ्या भुयारी मार्गाचे बांधकाम

* यां मार्गाची एकूण लांबी ४.७४ किमी असून त्यात २.३७ किमी लांबीचे दोन टनेल बांधण्यात येणार आहे .

* या प्रकल्पाचा एकूण खर्च ११६०.२३ कोटी इतका असणार आहे .

* हि निविदा डिजाइन आणि कन्स्ट्रुक्टशन या प्रकारची आहे .

* या कामासाठी दोन टनेल बोरिंग मशीन (TBM) वापरण्यात येणार आहे .

* या कामाला दोन वर्ष इतका कालावधी लागणार आहे . या भुयारी मार्गाचे काम जलद होण्यासाठी पुणे मेट्रोने आधीच स्वारगेट येथे शाफ्टचे काम सुरु केले आहे .

* या टनेलचा व्यास ६.३५ मी असून टनेलचे सर्व बाजुंनी काँक्रिट रिंग द्वारा आच्छादित केल्यानंरचा व्यास ५.८ मी .

इतका असणार आहे . यामुळे टनेल एखाद्या ट्युब सारखे तयार होईल.

भुयारी मार्गाचे काम उन्नत मार्गापेक्षा अधिक किचकट आणि वेळखाऊ असते . टनेल बोरिंग मशीन ची कार्यक्षमता जमिनीखाली असणाऱ्या दगडाच्या प्रकारावर अवलंबून असते . सर्वसाधारणपणे २४ तासात ५-७ मीटर लांबीचे टनेलचे काम एक मशीन करत असते. टनेलचे काम करत असताना. भुयारी मार्गाचे काम सुरु करण्यापूर्वी टोपोग्राफिकल , जिओटेक्निकल व बिल्डिंग कॅन्डिशन सर्वेचे काम केले जाते जेणेकरून जमिनीखालील व जमिनीवरील सर्व माहिती काम सुरु करण्यापूर्वी उपलब्ध होईल . भूपृष्ठावर किंवा जमिनीवरील घरे व इतर बांधकामावर प्रभाव पडू शकतो म्हणून महामेट्रो अश्या सर्व बांधकाम सुरु होण्यापूवी निरीक्षण करते व त्यानुसार सावधानी बाळगते . टनेल मध्ये उजेड व हवा खेळती राहण्यासाठी विशेष व्यवस्था केलेली असते .

स्वारगेट ते फडके हौद या भुयारी मार्गाचे काम अत्यंत आव्हानात्मक आहे . हा भाग शहराचा अत्यंत दाट लोकवस्तीचा भाग असून भुयारी मेट्रो स्टेशनचे एन्ट्री व एक्झिट उभारण्यासाठी येथे काही जागा मेट्रोला आवश्यक आहे . या भुयारी मेट्रो मार्गासाठी २९६ निवासी व १०६ दुकाने बाधित होणार आहे . मेट्रोने पुणे महापालिकेकडे बाधित व्यक्तींच्या घराजवळच (५०० मीटरपेक्षा कमी दूर ) जागा मागितली आहे जेणेकरून प्रकल्प बाधितांना पर्यायी घरे/ दुकाने उपलब्ध करून देता येइल . मेट्रोने ३८२ निवासी घरे व १०६ दुकाने प्रकल्पबाधितांना उपलब्ध करण्याचे नियोजन केले आहे . निवासी घरे ४३१ ते ५०० स्के. फूट (कार्पेट एरिया ) क्षेत्राचे असणार आहेत तर दुकाने १५० ते ३४७स्के. फूट क्षेत्राचे असणार आहेत . पुणे मेट्रोने भाऊ कोतवाल मंडई , दादोजी कोंडदेव शाळा , रानी झांशी स्कुल व इतर जवळच्या ठिकाणी प्रकल्प विस्थापितांसाठी निवासी घरे व दुकाने बांधण्याचे नियोजन केले आहे . पुणे मेट्रो सर्व प्रकल्प बाधितांना ते जेथे राहतात त्याच्या जवळच पर्यायी घरे / दुकान उपलब्ध करण्यासाठी बांधील आहे .




Bhau Kotwal Mandai , Budhwar Peth



Dadoji Kondev School , Budhwar Peth



Kadmbari Building , Mandai



PDCC Bank , Mandai



Rani Jhansi School , Mandai